डॉ.झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजना
योजनेचे मूल्यमापन करण्यास्तव समिती स्थापन
करणेबाबत

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:-अविवि-२०१७/प्र.क्र.१७७/का-६
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २२ सप्टेंबर, २०१७

प्रस्तावना:-

मुस्लिम समाजाच्या मागासलेपणाचा अभ्यास करण्यासाठी केंद्र शासनाने गठीत केलेल्या न्या. सच्चर समितीने या समाजाची शैक्षणिक व आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची असल्याचे निदर्शनास आणले आहे. तसेच मदरसांमध्ये राहून शिक्षण घेत असलेली बहुतांश मुले ही अत्यंत गरीब आर्थिक परिस्थितीतील असतात. याद्दष्टीने मा. पंतप्रधानाच्या नवीन १५ कलमी कार्यक्रमांतर्गत कलम ४ च्या अनुषंगाने राज्यातील अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक विकास आणि त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मदरशांमध्ये शिकत असलेल्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पारंपारिक धार्मिक शिक्षणाबरोबरच विज्ञान, गणित, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, इंग्रजी व उर्दू या विषयांचे शिक्षण देणे, मुख्य प्रवाहातील शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या इ. ९ वी, इ. १० वी, ११ वी व १२ वी तील तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमध्ये वाढ होऊन त्यांची रोजगार क्षमता वाढून आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत होईल या द्दष्टिने मदरशांच्या आधुनिकीकरणासाठी पायाभूत सुविधा, ग्रंथालयासाठी अनुदान देणे व शिक्षकांच्या मानधनासाठी अनुदान देण्याची डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना दिनांक ११/१०/२०१३ च्या शासन निर्णयान्वये सन २०१३-१४ पासून राबविण्यात येत आहे.

२. या योजनेत आतापर्यंत वितरीत करण्यात आलेला निधी, त्याचे जिल्हास्तरावरुन झालेले विनियोजन, निधीतून निर्माण करण्यात आलेल्या सुविधा, या योजनेचा मदरसातील विद्यार्थ्यांना झालेला लाभ, त्यांची गुणवत्ता वाढ तसेच इयत्ता १० वी च्या परीक्षेत बसू शकण्याबाबत झालेली प्रगती, तसेच सदर योजना चालू ठेवण्याची आवश्यकता आहे किंवा कसे, योजना चालू ठेवावयाची असल्यास अंमलबजावणीत आवश्यक असलेल्या सुधारणा इत्यादी मुद्यांच्या अनुषंगाने सर्वंकष मूल्यमापनासाठी समिती गठीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

१. डॉ.झाकीर हुसैन मदरसा आधुनिकीकरण योजनेच्या मूल्यमापनाकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

(अ) समितीची रचना:-

१) श्री. सतीश त्रिपाठी, भा.प्र.से. (से.नि.)	अध्यक्ष
२) श्री. ज. मो. अभ्यंकर, (माजी प्रकल्प संचालक, सर्व शिक्षा अभियान)	सदस्य
३) श्री. मफीउल हुसैन, भा.व.से. (से.नि.)	सदस्य

(ब) समितीची कार्यकक्षा:-

सदर समिती खालील मुद्यांच्या अनुषंगाने योजनेच्या अंमलबजावणीबाबत सविस्तर मूल्यमापन करेल -

१) राज्यातील मदरशांची सद्य:स्थिति

२) सदर योजनेचा लाभ घेतलेल्या मदरशांचा पूर्वेतिहास व सद्य:स्थिति

३) मदरशांना प्राप्त झालेल्या निधीचा वापर (सुविधा व शैक्षणिक) योग्य पध्दतीने झाला आहे किंवा कसे

४) योजनेतून निर्माण करण्यात आलेल्या सुविधांचा वापर

५) विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती- गुणवत्ता वाढ, इ.१० वी च्या परीक्षेस बसणेची तयारी

६) शिक्षकांची उपलब्धता व दर्जा

७) योजनेतील त्रुटी/ योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणी

८) प्रस्तावित सुधारणा

(क) समितीच्या कामकाजाचा कालावधी:-

समिती नियुक्त केल्याच्या दिनांकापासून ६ महिने

(ड) समितीच्या कामकाजाचे समन्वयन:-

सदर समितीस आवश्यक असलेले सर्व प्रकारचे सहकार्य तसेच समन्वयकाची भूमिका पार पाडण्यासाठी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

(इ) समितीच्या कामकाजाचा खर्च:-

या समितीचा कामकाजासाठी येणारा खर्च मागणी क्रमांक- झेडई-१, २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण (०१) (१२) संशोधन, प्रशिक्षण व योजनांना प्रसिध्दी याकरीता सहायक अनुदान (२२३५ ए १८७) ३१, सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

या समितीस देण्यात यावयाच्या पारिश्रमिक देण्याबाबतचे आदेश स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१७०९२२१२२५०७५९१४ असा आहे. सदरचा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Shyam Arjunrao Tagade

Digitally signed by Shyam Arjunrao Tagade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ebdccd1ea7bd29723d76653e72dddcc5cf97ff4fb69ce412d0d3c6d5c23adc3e, cn=Shyam Arjunrao Tagade
Date: 2017.09.22 12:50:41 +05'30'

(श्याम तागडे)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) श्री. सतीश त्रिपाठी, भा.प्र.से. (से.नि.)
२) श्री. ज. मो. अभ्यंकर, (माजी प्रकल्प संचालक, सर्व शिक्षा अभियान)
३) श्री. मफीउल हुसैन, भा.व.से. (से.नि.)
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
५) मा. मंत्री, अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास यांचे खाजगी सचिव
७) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
८) अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग
९) सचिव, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, मुंबई
१०) जिल्हाधिकारी (सर्व)
११) अल्पसंख्याक विकास विभागातील सर्व सहसचिव, उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी
१२) निवड नस्ती, कार्यासन-६